# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेतील शिक्षणशास्त्र विभागात मंगळवार दि. ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाच्या निमित्ताने भित्तीपत्रक सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली.

एम.एड अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी झालेल्या या स्पर्धेसाठी शिक्षक आणि शिक्षणाचे तात्विक अधिष्ठान, जीवन कौशल्य शिक्षणात शिक्षकाची भुमिका, शिक्षक शिक्षणातील नवप्रवर्तने आणि विद्यार्थ्यांच्या नेतृत्व गुण विकसनात शिक्षकाची भूमिका आदी विषय देण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. मनिषा इंदाणी होत्या. डॉ. संतोष खिराडे, डॉ. स्वाती तायडे, डॉ. रणजित पारधे आदींनी स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. ५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेतील शिक्षणशास्त्र विभागात शनिवार दि. ९ सप्टेंबर रोजी पीएच.डी प्रवेशपूर्व परीक्षा पेपर १ या विषयावर कार्यशाळा घेण्यात येणार आहे.

या कार्यशाळेसाठी नोंदणी शुल्क ५००/- रूपये आहे. अभ्यासक्रमावर आधारित परीक्षाभिमुख मार्गदर्शन, नमुना प्रश्न आणि सराव चाचणी घेतली जाणार आहे. अधिक माहितीसाठी शिक्षणशास्त्र विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

**बातमी क्रमांक ३**

जळगाव दि. ५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत प्रवर्तन व विद्यार्थी मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला.

यश रोडवेजचे मालक व उद्योजक मोरेश्वर उखे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हिमांशू उखे यांनी देखील नवउद्योजक कसा असावा यावर मार्गदर्शन केले. प्रशाळेच्या संचालक प्रा. मधुलिका सोनवणे यांच्यासह अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, प्रा. रमेश सरदार, प्रा. आर. आर. चव्हाण, हर्षल नेरकर, हर्षदीप सपकाळे, दीपक फेरवाणी आदी उपस्थित होते. प्रा. अतुल बारेकर यांनी सुत्रसंचालन केले. सागर वखारे यांनी आभार मानले.

---

जा.क्र.: कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ५ सप्टेंबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी